# कला-संस्कृतीचा वारसा तरुणांनी वृद्धिंगत करावा : कुलगुरु डॉ. शिर्के

प्रतिनिधी

कोल्हापूर

भारतीय कला, संस्कृतीचा वारसा वृद्धिंगत करणे ही तरुणांची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने युवा पिढीने कार्यरत राहावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा, इंद्रधनुष्य युवा महोत्सव, विभागीय युवा महोत्सव, राष्ट्रीय युवा महोत्सव आणि आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव आदींमध्ये यश प्राप्त केलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा गौरव समारंभ राजर्षी शाहू सभागृहात झाला. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित केले. १८ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सवामध्ये २१ स्पर्धांत सहभागी होऊन ६ सुवर्ण, ४६ रौप्य आणि ३ कांस्य पदके, ३६व्या पश्चिम विभागीय युवा महोत्सवात १० सुवर्ण व १६ कांस्य, ३६व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात ४५ सुवर्ण व १० कांस्य पदके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसह आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी झालेल्या २३ विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या संघाचा समावेश होता.

संघ व्यवस्थापक शीला मोहिते, भाग्यश्री कालेकर, तुकाराम शिंदे, संगीता पाटील, डॉ. एस.ए. महात, सुरेश मोरे यांचाही गौरव केला. डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तुकाराम शिंदे यांनी आभार मानले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. एस. एन. सपली, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग प्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. पी. ए. कदम, डॉ. एस. ए. शिंदे, डॉ. एस. एम. मस्के आदी उपस्थित होते.

सकाळ

# पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय भवनात पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. एस.एन. सपली, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग प्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. पी.ए. कदम, एस. ए. शिंदे, एस. एम. मस्के आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात दीनदयाळ उपाध्याय जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय भवनात पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. एस. एन. सपली, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग प्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. पी. ए. कदम, डॉ. एस. ए. शिंदे, डॉ. एस. एम. मस्के यांच्यासह प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी डॉ. आर. व्ही. गुरव



कोल्हापूर : विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी डॉ. आर. व्ही. गुरव यांची नियुक्ती झाली. विभागप्रमुख गटातून त्यांची नियुक्ती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केली आहे. त्यांच्या सदस्यपदाचा कालावधी एक वर्षाचा आहे. डॉ. गुरव वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

लोकमत

# दूरशिक्षणमार्फत उद्या एम.बी.ए. फेरप्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमासाठी उद्या, बुधवारी फेरप्रवेश परीक्षा होणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

दुपारी ३ ते ४:३० या वेळेत दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र येथे ही प्रवेश परीक्षा होईल. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी बुधवारी दुपारी १२ वाजेपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज https://sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login या लिंकवर भरावेत, असे आवाहन प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले.

पुढारी

# विद्यापीठातील 'दूरशिक्षण' केंद्रामार्फत उद्या एमबीए फेर प्रवेश परीक्षेचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी विद्यापीठाच्या वतीने बुधवार (दि. २७) रोजी फेर प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.



विद्यापीठाकडून यापूर्वी घेतलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया झाली आहे. तथापि, विद्यार्थी हितास्तव फेर प्रवेश परीक्षेचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना एम.बी. ए. साठी प्रवेश निश्चितीसाठी बुधवारी दुपारी १२ वाजेपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज https://sukapps. unishivaji. ac. in/ pgentrance/#/ login या लिंकवर भरावेत. त्याचदिवशी दुपारी ३ ते ४.३० या वेळेत दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे प्रवेश परीक्षेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

सकाळ

# विद्यार्थ्यांच्या आवाजाचा प्रतिध्वनी शिक्षकांच्या मनात उमटवा : डॉ. ज्ञानेश्वर मुळे

कोल्हापूर : 'विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांनी आपुलकीची भावना निर्माण करावी. विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये सुसंवाद प्रस्थापित व्हावा. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रतिध्वनी शिक्षकांच्या मनात उमटला पाहिजे, तरच शिक्षण अर्थपूर्ण होईल', असे प्रतिपादन मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि इंग्लिश मीडियम स्कूल असोसिएशनतर्फे एज्युरिफॉर्म प्रकल्पातंर्गत आयोजित माध्यमिक शिक्षकांसाठी नावीन्यपूर्ण अध्यापन पध्दतीच्या प्रशिक्षण प्रारंभावेळी ते बोलत होते. युरोपिअन युनियनचे अर्थसहाय्य असलेला प्रकल्प शिक्षणशास्त्र विभागात सुरू आहे. चौथ्या औद्योगिक क्रांतीचा भारतीय शिक्षण पद्धतीवर होणारा परिणाम अभ्यासणे या प्रकल्पाचे ध्येय आहे. संबंधित कार्यक्रमात १० नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर यांनी दिली. प्रशिक्षणासाठी डॉ. वि. सं. खंडागळे, इनोवेशन मॅनेजर डॉ. जी. एस. जोशी, इंग्लिश टीचर असोसिएशनचे राज्य अध्यक्ष नितीन नायकवडे, महेश पोळ आदींनी परिश्रम घेतले.

तरुण भारत

# दूरशिक्षणतर्फे एमबीए फेर प्रवेश परीक्षा बुधवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम. बी. ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२३–२४ साठी विद्यापीठाने घेतलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विध्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया झालेली आहे. विद्यार्थी हित लक्षात घेता विद्यार्थ्यांनी बुधवार २७ सप्टेंबरपर्यंत दुपारी १२ वाजेपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज httpsë// sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login या लिंकवर भरावयाचा आहे. तर दुपारी ३ ते ४:३० या वेळेत दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे प्रवेश परीक्षा होणार आहे. डॉ. मोरे म्हणाले, एम. बी. ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थीना मार्केटिंग, मानव संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन, इंटरनॅशनल बिझनेस तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम. बी. ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी, उद्योजक, व्यवसायिक इत्यादी प्रवेश घेवू शकतात. तरी ज्या विद्यार्थ्यांना एम. बी. ए. साठी प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांनी एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी नरावी, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.